सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७

# महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उपसभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६

(दिनांक १२ जानेवारी, २००६ पर्यंत सुधारलेला)

## BOMBAY ACT No. XLVII OF 1956

# The Maharashtra Legislative Council (Chairman and Deputy Chairman) and Maharashtra Legislative Assembly (Speaker and Deputy Speaker) Salaries and Allowances Act

*( As modified upto 12th January, 2006 )*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

( किंमत : २ रुपये )

## सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७

## महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उपसभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम

### अनुक्रमणिका

| | | पृष्ठे |
|---|---|---|
| | उद्देशिका | |
| | कलमे | |
| १. | संक्षिप्त नाव व प्रारंभ. | ४ |
| २. | व्याख्या. | ४ |
| ३. | सभापती व अध्यक्ष यांचे वेतन. | ४ |
| ४. | सभापती व अध्यक्ष यांची निवासस्थाने. | ५ |
| ४/क | सभापती व अध्यक्ष यांना द्यावयाचा आतिथ्य भत्ता. | ५ |
| ५. | सभापती व अध्यक्ष यांच्यासाठी वाहने. | ५ |
| ६. | प्रवास भत्ते व दैनिक भत्ते. | ५ |
| ७. | वैद्यकीय मदत. | ६ |
| ७/क | राज्य विधानमंडळाच्या अधिकाऱ्यांसाठी दूरध्वनीच्या सोयी. | ६ |
| ८. | रेल्वेने किंवा बोटीने मोफत प्रवास. | ७ |
| ९. | सभापती व उपसभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांस राज्य विधानमंडळाचे सदस्य म्हणून वेतन व भत्ते मिळण्याचा हक्क नसणे. | ८ |
| १०. | उपसभापती व उपाध्यक्ष यांचे वेतन. | ८ |
| १०/क | सभापती, उपसभापती, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना बैठक भत्ता देणे. | ८ |
| ११. | उपसभापती व उपाध्यक्ष यांची निवासस्थाने. | ९ |
| ११/क. | उपसभापती व उपाध्यक्ष यांच्यासाठी वाहने. | ९ |
| १२. | प्रवास भत्ते व दैनिक भत्ते. | ९ |
| १२/क. | वैद्यकीय मदत. | १० |
| १२/ख | स्वीय सहायकविषयक सोय. | १० |
| १३. | राज्य शासनाचा नियम करण्याचा व आदेश देण्याचा अधिकार. | १० |
| १४. | निरसन. | ११ |

# सन १९५६[१] चा मुंबई अधिनियम क्र. ४७

## महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उपसभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम

[या अधिनियमास दिनांक ३० नोव्हेंबर, १९५६ रोजी राज्यपाल यांची संमती मिळाली आणि तो "**मुंबई राजपत्र** भाग चार" मध्ये दिनांक ३० नोव्हेंबर, १९५६ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिध्द करण्यात आला.]

या अधिनियमात पुढील अधिनियम व आदेश याद्वारे अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :--

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१.

सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०. (२५-४-१९७३)*

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१. (८-९-१९७५)*

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८. (१-४-१९७७)*

सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५. (१-४-१९८१)*

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८.#

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७२. $ (१-४-१९८१)

सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० (१-२-१९८२)*

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २. @@ (१-८-१९८५)*

सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ (१-८-१९८७)*

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४. (१-७-१९८८)*

सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २. @@@

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३. (१-८-१९९३)*

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **मुंबई राजपत्र,** १९५६, भाग पाच, पृ. ३३८ (इंग्रजी) पहावे.

* अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवितो.

# सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८ हा, त्यांची कलमे ५, ७ व ९ वगळून दिनांक १ एप्रिल, १९८१ पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल. कलमे ५, ७ व ९ ही दिनांक ८ सप्टेंबर, १९८१ पासून म्हणजेच हा अधिनियम, शासकीय राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात आली आहेत.

$ या अधिनियमाची कलमे १, २, ४, ५, ६, ७ व ८ ही दिनांक १ एप्रिल, १९८१ पासून अंमलात आली असल्याचे मानण्यात येईल, आणि कलमे ३ व ९ ही दिनांक २९ डिसेंबर, १९८१ पासून अंमलात आली आहेत.

@@ सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ हा, त्याची कलमे १, २ व ५ वगळून दिनांक १ ऑगस्ट, १९८५ पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल. कलमे १, २ व ५ ही दिनांक २८ जानेवारी, १९८६ पासून म्हणजेच हा अधिनियम, शासकीय राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात आली आहेत.

@@@ या अधिनियमांची कलमे २, ४ व ५ ही दिनांक १ जून, १९९० पासून अंमलात आली आहेत. तर कलम ३ हे दिनांक २० मे, १९८७ पासून अंमलात आले आहे.

## महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उपसभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन भत्ते अधिनियम

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०. (१-१-१९९७)*
सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२. (१-५-१९९९)*
सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५४. (१-८-२०००)*
सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८. (८-१-२००१)*
सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५. (१-१-२००३)*
सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०. (१-४-२००५)*

**[१][महाराष्ट्र विधानपरिषदेच्या] सभापतीचे व उपसभापतीचे आणि [१][महाराष्ट्र विधानसभेच्या] अध्यक्षांचे व उपाध्यक्षांचे वेतन व भत्ते आणि कित्येक इतर बाबी यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम**

**ज्याअर्थी,** [२][महाराष्ट्र विधनपरिषदेच्या] सभापतींचे व उपसभापतींचे आणि [२][महाराष्ट्र विधानसभेच्या] अध्यक्षांचे व उपाध्यक्षांचे वेतन व भत्ते ठरविणे व यात या पुढे दिलेल्या कित्येक इतर बाबी यासंबंधी तरतूद करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :--

**संक्षिप्त नाव व प्रारंभ**

१. [३][(१) या अधिनियमास महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभापतींचे व उपसभापतींचे व महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षांचे व उपाध्यक्षांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, असे म्हणावे.]

(२) तो दिनांक १ नोव्हेंबर, १९५६ रोजी अंमलात आला असल्याचे समजण्यात येईल.

**व्याख्या**

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(क) "विधानसभा" याचा अर्थ [४][महाराष्ट्र विधानसभा], असा आहे ;

(ख) "सभापती" व "उपसभापती" याचा अर्थ विधानपरिषदेचा अनुक्रमे सभापती व उपसभापती, असा आहे ;

(ग) "विधानपरिषद" याचा अर्थ [५][महाराष्ट्र विधानपरिषद], असा आहे ;

(घ) निवास्थानाच्या संबंधात "परिरक्षण" याचा अर्थ, शासनाला किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला देणे असलेली पट्टी व कर भरणे आणि वीज, गॅस व पाणी यांची तरतूद करणे, असा आहे ;

(ङ) "निवासस्थान" याचा अर्थ, नोकरवर्गाच्या राहण्याच्या जागा आणि त्यांना लागून असलेल्या इतर इमारतींसह असलेल्या बागा, असा आहे ;

(च) "नियम किंवा आदेश " याचा अर्थ, या अधिनियमा अन्वये अनुक्रमे केलेले नियम किंवा दिलेले आदेश, असा आहे ;

(छ) "अध्यक्ष" व "उपाध्यक्ष" याचा अर्थ, विधानसभेचा अनुक्रमे अध्यक्ष व उपाध्यक्ष, असा आहे .

**सभापती व अध्यक्ष यांचे वेतन**

३. सभापती व अध्यक्ष यापैकी प्रत्येकास [६][[७] [दरमहा [८][रु. ५,०००]] इतके वेतन], देण्यात येईल.

---

१. सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या अनुसूचीद्वारे, अनुक्रमे "मुंबई विधानपरिषदेच्या" व "मुंबई विधानसभेच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर घालण्यात आला.

* अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवितो.

२. वरील अधिनियमाद्वारे, अनुक्रमे "मुंबई विधानपरिषदेच्या" व "मुंबई विधानसभेच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर घालण्यात आला.

३. वरील अधिनियमाद्वारे पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.

४. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये "मुंबई विधानसभा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. वरील आदेशान्वये "मुंबई विधानपरिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम, क्र. ५१ च्या कलम २ अन्वयें "दरमहा १,१०० रुपये इतका पगार" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७. सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० च्या कलम ३ (अ) अन्वये, हा मजकूर दाखल करण्यात आला.

८. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम २ अन्वये, "रुपये २५००" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. (१) सभापती व अध्यक्ष यांपैकी प्रत्येकास तो पदावर असेपर्यंतच्या संपूर्ण कालावधीत आणि त्यानंतर लगतच्या पंधरा दिवसांच्या कालावधीत भाडे न आकारता मुंबई येथे फर्निचर व इतर सुखसोयींनी सुसज्ज असलेले निवासस्थान वापरण्याचा किंवा अशा निवासस्थानाऐवजी [१][दरमहा रुपये २,५०० या दराने घरभत्ता आणि त्या व्यतिरिक्त त्याने मुंबईतील त्याच्या (राज्य शासनाने या अधिनियमाखाली पुरविलेल्या जागेव्यतिरिक्त असलेल्या) निवासस्थानासाठी त्याने वीज आकार व पाणीपट्टी यासाठी जो कोणताही खर्च केला असेल तर तेवढी रक्कम,] मिळण्याचा हक्क असेल. **सभापती व अध्यक्षांची निवासस्थाने.**

(२) या कलमान्वये पुरविण्यात आलेल्या कोणत्याही निवासस्थानाच्या व्यवस्थेच्या संबंधात खुद्द सभापती किंवा अध्यक्ष यांवर कोणताही आकार पडणार नाही.

(३) या कलमान्वये पुरविण्यात आलेली कोणतीही निवासस्थाने फर्निचर, वगैरेंनी सुसज्जित करण्याचा खर्च, राज्य शासन नियम करुन किंवा आदेश देऊन ठरवील अशा प्रमाणात असेल.

[२][(४) जेंव्हा सभापती व अध्यक्ष यांना पोट कलम (१) अन्वये घरभत्ता व इतर रक्कम देय असेल त्याबाबतीत, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्या खेरीजकरुन त्यांच्या निवासस्थानाच्या संबंधात राज्य शासन, कोणतीही भर घालण्याचे, त्यात फेरबदल करण्याचे, परिरक्षण करण्याचे, दुरुस्ती करण्याचे काम किंवा अन्य कोणतीही गोष्ट करण्याकरिता, कोणताही खर्च करणार नाही, आणि त्यासाठी कोणतीही रक्कम मिळण्याचा सभापतीस किंवा अध्यक्षास हक्क असणार नाही.]

[३][४क सभापती व अध्यक्ष यांच्यापैकी प्रत्येकास दरवर्षी [४][चार लाख रुपये] आतिथ्य भत्ता [५][म्हणून स्वाधीन करण्यात येईल]. **सभापती व अध्यक्ष यांना द्यावयाचा आतिथ्य भत्ता.**

५. (१) सभापती व अध्यक्ष यांच्या उपयोगाकरिता मोटारगाड्या व इतर योग्य वाहने वेळोवेळी राज्य शासनाने खरेदी केली पाहिजेत व पुरविली पाहिजेत. ती सुस्थितीत ठेवणे व दुरुस्त करणे या संबंधी, याबाबत नियम करुन किंवा आदेश देऊन ठरविण्यात येतील अशा शर्तीवर ती पुरविली जातील [६][तसेच राज्य शासनास, अशा रितीने पुरविलेल्या प्रत्येक मोटारगाडीकरिता किंवा वाहनाकरिता शोफरच्या विनामूल्य सेवेची व्यवस्था करता येईल.] **सभापती व अध्यक्ष यांच्यासाठी वाहने.**

(२) त्याचप्रमाणे सभापती व अध्यक्ष यापैकी प्रत्येकास [७][त्या बाबतीत केलेल्या नियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा दरमहा दराने] वाहनभत्ताही द्यावयास पाहिजे.

[८][६. राज्य शासनाने याबाबत केलेल्या कोणत्याही नियमास अधीन राहून, सभापती किंवा अध्यक्ष यांस :-- **प्रवासभत्ते व दैनिक भत्ते.**

(क) (एक) पदग्रहण करण्यासाठी, मुंबईबाहेरील त्यांच्या नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणापासून मुंबईपर्यंत केलेल्या प्रवासाबाबत, आणि

---

१. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम २ (क) अन्वये "रुपये २५०" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम २ (ख) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

३. सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २ अन्वये कलम ४क समाविष्ट करण्यात आले.

४. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ३ अन्वये "रुपये दोन लाख" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१ याच्या कलम ३ (क) अन्वये "म्हणून देण्यात येईल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१ च्या कलम ४ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

७. सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २ अन्वये "दरमहा रु. १००० या दराने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

८. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ च्या कलम २ अन्वये मूळ कलमाऐवजी, कलम ६ दाखल करण्यात आले.

(दोन) पद सोडल्यावर मुंबईपासून त्याच्या मुंबईबाहेरील नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणापर्यंत केलेल्या प्रवासाबाबत,

स्वत:साठी व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींसाठी आणि त्याच्या व त्यांच्या कुटुंबाच्या सामानाची वाहतूक करण्यासाठी प्रवास भत्ता, आणि ;

(ख) सार्वजनिक कामासाठी त्याने केलेल्या दौऱ्यांबाबत प्रवासभत्ता व दैनिक भत्ता ; मिळण्याचा अधिकार असेल,

**स्पष्टीकरण.**--"मुंबई" या शब्दप्रयोगात राज्य शासनाने या कलमाच्या प्रयोजनासाठी नेमलेल्या कोणत्याही ठिकाणाचा समावेश होतो.]

द्यकीय मदत.

७. राज्य शासनाने केलेल्या नियमास अथवा दिलेल्या आदेशास अधीन राहून, सभापती व अध्यक्ष यथास्थिति, सभापतीच्या किंवा अध्यक्षांच्या बरोबर राहणाऱ्या किंवा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या त्याच्या कुटुंबातील व्यक्ती यांना राज्य शासनाने चालविलेल्या रुग्णालयात जागा मोफत मिळण्याच्या व वैद्यकीय मदत व उपचार मोफत मिळण्याचा हक्क असेल.

**स्पष्टीकरण.**--या कलमाच्या प्रयोजनाकरिता "कुटुंबातील व्यक्ती" या संज्ञेचा अर्थ, पती, पत्नी, मुलगा, मुलगी, वडील, आई, भाऊ किंवा बहिण, असा आहे.

राज्य विधान-मंडळाच्या धिकाऱ्यांसाठी ध्वनीची सोय.

[१][**७क.** (१) राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक अधिकाऱ्यास, तो पदावर असेल त्या मुदतीत, त्याच्या निवासस्थानी किंवा त्यांच्या मतदार संघात त्याने निवडलेल्या कोणत्याही (राज्य शासनाने या अधिनियमान्वये पुरविलेल्या राहण्याच्या ठिकाणाव्यतिरिक्त असणाऱ्या) ठिकाणी राज्य शासनाच्या खर्चाने दूरध्वनी बसवून मिळण्याचासुध्दा हक्क असेल.

(२) राज्य विधानमंडळाच्या अधिकाऱ्याला पोट-कलम (१) अन्वये बसविलेल्या दूरध्वनीच्या बाबतीत, तो बसविण्याबद्दल, त्यासाठी ठेवावयाच्या प्रारंभिक ठेवीदाखल, भाडे खर्चाबद्दल, त्याच्या परिरक्षणादाखल आणि त्यावरुन केलेल्या सरकारी दूरभाषितांदाखल व्यक्तिशः कोणताही आकार पडणार नाही.

(३) या कलमान्वये, ज्या महिन्यात दूरध्वनीची सोय पुरविण्यात येईल त्या महिन्यापासून राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक अधिकाऱ्यास दरमहा [२][रु. ८,००० इतकी] रक्कमही देण्यात येईल.

[३][(४) जेव्हा राज्य विधानमंडळाच्या पदाधिकाऱ्याने पोट-कलम (१) मध्ये निर्देशलेल्या कोणत्याही ठिकाणी स्वत:च्या खर्चाने दूरध्वनी बसवून घेतला असेल त्याबाबतीत,--

(क) अशा दूरध्वनीच्या संबंधातील दूरध्वनी भाडेखर्च राज्य शासनाकडून केला जाईल ; आणि अशा पदाधिकाऱ्याला अशा दूरध्वनीच्या बाबतीत दरमहा [४][रुपये ८,०००] इतकी रक्कम देण्यात येईल आणि ;

(ख) जर असा पदाधिकारी अशा ठिकाणी निवासस्थान म्हणून राहत असेल आणि त्यास या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तद्न्वये राज्य शासनाकडून वेगळा दूरध्वनी पुरविण्यात आला नसेल तर, अशा दूरध्वनीवरून शासकीय कामासाठी केलेल्या दूरध्वनी संबंधातील खर्चदेखील राज्य शासनाकडून केला जाईल].

**स्पष्टीकरण.**--या कलमात, [५][व-कलम ८ मध्ये] राज्य विधानमंडळाचा अधिकारी याचा अर्थ सभापती व उपसभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष असा आहे.

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २ अन्वये कलम ७क समाविष्ट करण्यात आले.

२. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ४ (क) अन्वये "रुपये ६०००" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ४ द्वारे पोट-कलम (४) दाखल करण्यात आले.

४. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ४(ख) अन्वये "रुपये ६०००" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२ याच्या कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१]८. (१) [२][***] राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक अधिकाऱ्यास त्याबाबत नियमाद्वारे किंवा आदेशाद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तींच्या अधीन, ज्यामुळे त्यास एकट्याने कोणत्याही वेळी भारताच्या कोणत्याही भागात कोणत्याही रेल्वेने [३][पहिल्या वर्गाने किंवा, यथास्थिति, वातानुकुलित टू-टियरने] किंवा महाराष्ट्राच्या कोणत्याही भागात बोटीने प्रवास करण्याचा हक्क मिळेल अशा सोयी पुरविण्यात येतील : **रेल्वेने किंवा बोटीने मोफत प्रवास**

परंतु, अधिकाऱ्यास एकतर एकट्याने किंवा आपल्या विवाहसाथीसह किंवा आपल्या अज्ञान मुलांसह संयुक्तपणे किंवा आपल्या विवाहसाथीसह व अज्ञान मुलांसह [४][किंवा सोबत्यासह] संयुक्तपणे, भारताच्या कोणत्याही भागात, मग तो भाग राज्यातील असो किंवा राज्याबाहेरील असो, रेल्वेने असा प्रवास करता येईल. तथापि, अशा अधिकाऱ्याने राज्याबाहेर प्रवास केलेले अंतर आणि त्याच्या कुटुंबातील व्यक्तिंनी, [५][किंवा सोबत्याने] राज्यात किंवा राज्याबाहेर प्रवास केलेले अंतर हे, कोणत्याही वित्तीय वर्षी एकूण [६][तीस] हजार किलोमीटरांपेक्षा अधिक होता कामा नये.

**स्पष्टीकरण.**—प्रवासाच्या अंतरासाठी असलेली [६][तीस] हजार किलोमीटरची कमाल मर्यादा मोजण्याच्या प्रयोजनासाठी अधिकाऱ्याने राज्याबाहेर केलेल्या प्रवासाचे किलोमीटर्स व त्याच्या कुटुंबातील व्यक्तींनी [७][किंवा सोबत्याने] त्यांच्या निवासस्थानापासून, मग ते राज्यातील असो किंवा राज्याबाहेरील असो, केलेल्या प्रवासाचे किलोमीटर्स हे वेगवेगळे मोजण्यात आले पाहिजेत.

(२) (क) या अधिनियमात काहाही अंतर्भूत असले तरी, जर अधिकारी एक तर एकट्याने किंवा त्याच्या विवाहसाथीसह किंवा त्याच्या अज्ञान मुलांसह संयुक्तपणे किंवा त्याच्या विवाहसाथी आणि अज्ञान मुले [८][किंवा सोबती] यांच्यासह संयुक्तपणे राज्यात किंवा राज्याबाहेर भारताच्या कोणत्याही भागात या कलमात तरतूद केल्याप्रमाणे रेल्वेऐवजी विमानाने प्रवास करील तर त्यास, जणू काही यथास्थिति त्याने किंवा त्या दोघांनी किंवा त्या सर्वांनी [९][रेल्वेच्या पहिल्या वर्गाने प्रवास] केला होता असे समजून प्रवासासाठी असलेल्या [६][तीस] हजार किलोमीटर्सच्या मर्यादेस अधीन राहून, प्रवास भत्त्याची मागणी करण्याचा हक्क असेल: अशा बाबतीत, विमानाने केलेल्या प्रवासाचे भाडे आणि [९][रेल्वेच्या पहिल्या वर्गाचे प्रवास भाडे] यांतील फरकाची रक्कम अधिकाऱ्याला सोसावी लागेल.

(२) (ख) ज्या बाबतीत उपरोक्तप्रमाणे एखादा अधिकारी एकतर एकट्याने किंवा त्याच्या कुटुंबातील व्यक्तींसह [१०][किंवा सोबत्यांसह] संयुक्तपणे हा प्रवास राज्याबाहेर भारतातील कोणत्याही भागात, बोटीने किंवा मार्ग परिवहनाच्या बसने करील त्याबाबतीत त्याला प्रवासासाठी असलेल्या [६][तीस] हजार किलोमीटर्सच्या कमाल मर्यादेच्या अधीन

---

१. सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७२ च्या कलम ४ अन्वये कलम ८ दाखल करण्यात आले.

२. सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३ (क) (एक) अन्वये "१ एप्रिल, १९९१ पासून" हा मजकूर वगळण्यात आला.

३. सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३ (क) (दोन) अन्वये "प्रथम श्रेणी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २ (क)(एक)(क)अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

५. सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २ (क)(एक)(ख )अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

६. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ४ अन्वये "वीस हजार किलोमीटर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७. वरील अधिनियमाच्या कलम २ (क) (दोन )अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

८. वरील अधिनियमाच्या कलम २ (ख) (एक )अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

९. सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३ (ख) अन्वये "रेल्वेने प्रवास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१०. सन २००१ चा महाराष्ट्र ८ याच्या कलम २ (ख) (दोन )अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

राज्याबाहेरील भारताच्या कोणत्याही भागात प्रवास करण्यासाठी तेवढ्याच अंतरासाठी [१][रेल्वेच्या पहिल्या वर्गाच्या प्रवासाच्या] भाड्यापेक्षा बोटीच्या प्रवासाचे भाडे किंवा बसचे भाडे कमी असेल तर, असे कमी भाडे मागण्याचा हक्क राहील किंवा जर बोटीच्या प्रवासाचे भाडे किंवा बसचे भाडे तेवढ्याच अंतराच्या [१][रेल्वेच्या पहिल्या वर्गाचा प्रवास] भाड्याची मागणी करण्याचा हक्क राहील आणि त्याला दोन भाड्यांमधील फरक सोसावा लागेल.

(३) या कलमात ज्या बाबतीत राज्य विधानमंडळाच्या एखाद्या अधिकाऱ्याला त्याच्या विवाहसाथीसह संयुक्तपणे (अज्ञान मुलांसह किंवा अज्ञान मुलांशिवाय) [२][किंवा सोबत्यासह] प्रवास करण्याची सुविधा देण्यात आली असेल त्या बाबतीत, वरिष्ठ अधिकारी महिला असल्यास तिला प्रवासाच्या या सुविधांचा, वेळोवेळी तिच्या पतीसह किंवा त्याऐवजी कलम १२-क च्या स्पष्टीकरणात व्याख्या केल्याप्रमाणे तिच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीसह संयुक्तपणे वापर करण्याचा हक्क राहील.]

**[५][सभापती व उपसभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांस राज्य विधानमंडळाचे सदस्य म्हणून वेतन व भत्ते मिळण्याचा हक्क नसणे.]**

**९.** राज्य विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते ठरविणाऱ्या त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यांत कोणताही मजकूर असला तरीही [३][सभापतीस, उपसभापतीस, अध्यक्षास, किंवा उपाध्यक्षास] [४][तो] विधानपरिषदेचा किंवा विधानसभेचा सदस्य असला तरी, कायद्यान्वये कोणतेही वेतन किंवा भत्ते मिळण्याचा हक्क असणार नाही.

**उपसभापती व उपाध्यक्ष यांचे वेतन.**

**१०.** उप-सभापती व उपाध्यक्ष यांस [६][दरमहा [७][४,६००] इतके वेतन] देण्यात येईल.

**सभापती व उपसभापती, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना बैठक भत्ता देणे.**

[८][**१०क.** प्रत्येक सभापती, उपसभापती, अध्यक्ष व उपाध्यक्ष तो अशा सभापतींच्या, उपसभापतींच्या, अध्यक्षांच्या किंवा यथास्थिति उपाध्यक्षांच्या पदावर असताना त्या कालावधीत प्रतिदिनी [९][२००] या दराने बैठक भत्ता मिळण्यास हक्कदार असेल.]

---

१. सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३(ख) अन्वये "रेल्वेने प्रवास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन २००१ चा महाराष्ट्र ८ याच्या कलम २ (ग) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ च्या कलम ४ (क) द्वारे "सभापतीस व अध्यक्षास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ४ (ख) अन्वये "असा सभापती किंवा अध्यक्ष" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ४ (ग) अन्वये समासटीपेतील "सभापती व अध्यक्ष" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१ च्या कलम ५ अन्वये "दरमहा रुपये ७५० इतका पगार" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ५ अन्वये "रुपये २३००" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

८. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ६ अन्वये कलम १०क समाविष्ट करण्यात आले.

९. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ६ अन्वये "रुपये १५०" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][११. (१) उपसभापतीस व उपाध्यक्षास प्रत्येकी, तो पदावर असेपर्यंतच्या संपूर्ण मुदतीत आणि त्यानंतर लगतच्या पंधरा दिवसांच्या कालावधीत भाडे न आकारता मुंबई येथे फर्निचर व इतर सुखसोयींनी सुसज्ज असलेले निवासस्थान वापरण्याचा किंवा अशा निवासस्थानाऐवजी [२][दरमहा रुपये २,५०० या दराने घरभत्ता आणि त्या व्यतिरिक्त, त्याने मुंबईतील त्याच्या (राज्य शासनाने या अधिनियमाखाली पुरविलेल्या जागेव्यतिरिक्त असलेल्या) निवासस्थानासाठी त्याने वीज आकार व पाणीपट्टी यासाठी जो कोणताही खर्च केला असेल तर तेवढी रक्कम] या दराने घरभाडे भत्ता मिळण्याचा हक्क असेल. **उपसभापती व उपाध्यक्ष यांची निवासस्थाने.**

(२) या कलमान्वये पुरविण्यात आलेल्या कोणत्याही निवासस्थानाच्या व्यवस्थेच्या संबंधात, व्यक्तिशः उपसभापती किंवा उपाध्यक्ष यांच्यावर कोणताही आकार पडणार नाही.

(३) या कलमान्वये पुरविण्यात आलेली कोणतीही निवासस्थाने, फर्निचर वगैरेंनी सुसज्जित करण्याचा खर्च, राज्य शासन नियम करून किंवा आदेश देऊन ठरवील अशा प्रमाणात असेल.

[३][(४) जेंव्हा उप-सभापती व उपाध्यक्ष यांना पोट-कलम (१) अन्वये घरभाडे भत्ता व इतर रक्कम देय असेल त्याबाबतीत, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल, ते खेरीज करून त्यांच्या निवासस्थानाच्या संबंधात राज्य शासन कोणतीही भर घालण्याचे, त्यात फेरबदल करण्याचे, परिरक्षण करण्याचे, दुरुस्ती करण्याचे काम किंवा अन्य कोणतीही गोष्ट करण्याकरिता कोणताही खर्च करणार नाही, आणि त्यासाठी कोणतीही रक्कम मिळण्याचा उपसभापतीस किंवा उपाध्यक्षास हक्क असणार नाही.]

**११क.** (१) राज्य शासनाने, उपसभापती आणि उपाध्यक्ष यांच्या उपयोगासाठी मोटारगाड्या व इतर योग्य वाहने वेळोवेळी खरेदी केली पाहिजेत व पुरविली पाहिजेत. ती सुस्थितीत ठेवणे व दुरुस्त करणे यासंबंधी याबाबत नियम करून किंवा आदेश देऊन ठरविण्यात येतील अशा शर्तीवर ती पुरविली जातील. [४][तसेच राज्य शासनास अशा रितीने पुरविलेल्या प्रत्येक मोटार गाडीकरिता व वाहनाकरिता शोफरच्या विनामूल्य सेवेची व्यवस्था करता येईल.] **उपसभापती आणि उपाध्यक्ष यांच्यासाठी वाहने.**

(२) उपसभापतीस व उपाध्यक्षास प्रत्येकी [५][त्याबाबतीत केलेल्या नियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा दरमहा दराने] वाहन भत्ताही द्यावयास पाहिजे.

[६][**१२.** [७]* * * राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमास अधीन राहून, उपसभापती किंवा उपाध्यक्ष यास-- **[८][प्रवास व दैनिक भत्ते.]**

(क) (एक) पदग्रहण करण्यासाठी, मुंबईबाहेरील त्याच्या नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणापासून मुंबईपर्यंत केलेल्या प्रवासाबाबत ; आणि

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ६ अन्वये, मूळ कलम ११ ऐवजी कलमे ११ व ११-अ दाखल करण्यात आली.

२. सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ५(क) अन्वये "दरमहा रुपये १५०" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ५ (ख ) अन्वये हे पोट कलम जादा दाखल करण्यात आले.

४. सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१ च्या कलम ६ अन्वये, हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

५. सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ च्या कलम ५ अन्वये "दरमहा रु. १००० या दराने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ च्या कलम ३ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम १२ दाखल करण्यात आले.

७. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ च्या कलम ७ (क) अन्वये "कलम ११ च्या तरतुदीस" हा मजकूर वगळण्यात आला.

८. वरील अधिनियमाच्या कलम ७ (ख ) अन्वये उक्त कलमाच्या समासटीपेऐवजी ही समासटीप दाखल करण्यात आली.

(दोन) पद सोडल्यावर मुंबईपासून त्याच्या मुंबई बाहेरील नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणापर्यंत केलेल्या प्रवासाबाबत स्वत:साठी, त्याच्या कुटुंबातील व्यक्तींसाठी आणि त्यांच्या व त्यांच्या कुटुंबाच्या सामानाची वाहतूक करण्यासाठी प्रवासभत्ता ; आणि

(ख) सार्वजनिक कामासाठी त्याने केलेल्या दौऱ्यांबाबत प्रवासभत्ता व दैनिक भत्ता ;

मिळण्याचा हक्क असेल.

**स्पष्टीकरण.**--"मुंबई" या शब्दप्रयोगात राज्य शासनाने या कलमाच्या कारणांसाठी नेमलेल्या इतर कोणत्याही ठिकाणाचा समावेश होतो.]

**वैद्यकीय मदत.**

[१][**१२-क** राज्य शासनाने केलेल्या नियमास अथवा दिलेल्या आदेशास अधीन राहून, उपसभापती आणि उपाध्यक्ष आणि यथास्थिति, उपसभापती किंवा उपाध्यक्ष यांच्याबरोबर राहणाऱ्या व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती यांना राज्य शासनाने चालविलेल्या रुग्णालयात मोफत जागा मिळण्याचा व वैद्यकीय मदत आणि उपचार मोफत मिळण्याचा हक्क असेल.

**स्पष्टीकरण.**--या कलमाच्या प्रयोजनाकरिता "कुटुंबातील व्यक्ती" या शब्दप्रयोगाचा अर्थ, पती, पत्नी, मुलगा, मुलगी, वडील, आई, भाऊ किंवा बहीण, असा आहे.]

**स्वीय सहायक-विषयक सोय.**

[२][**१२-ख.** सभापतीस, अध्यक्षास, उपसभातीस आणि उपाध्यक्षास, स्वीय सहायकाच्या सेवा विनामूल्य मिळण्याचा हक्क असेल. या प्रयोजनासाठी, यथास्थिति, सभापतीस, उपसभापतीस, अध्यक्षास किंवा उपाध्यक्षास, कलम १३ अन्वये केलेल्या नियमाद्वारे किंवा काढलेल्या आदेशाद्वारे, विहित करण्यात येईल अशी अर्हता धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, आपला स्वीय सहायक म्हणून नेमता येईल. या बाबतीत करण्यात येतील अशा नियमास किंवा आदेशास अधीन राहून अशा रितीने नेमलेल्या सहायकास राज्य शासनाकडून दरमहा [३][रु. ७,०००] एवढे नियत वेतन मिळेल.]

**राज्य शासनाचा नियम करण्याचा व आदेश देण्याचा अधिकार.**

**१३.** [४][(१) राज्य शासनास सभापती व अध्यक्ष यांच्याशी विचारविनिमय करून या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याकरिता नियम करता येतील किंवा आदेश देता येतील.

(१-क) या अधिनियमान्वये केलेले सर्व नियम किंवा दिलेले सर्व आदेश, ते केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर ठेवले पाहिजेत.]

(२) या कलमान्वये केलेला कोणताही नियम किंवा दिलेला कोणताही आदेश, दिनांक १ नोव्हेंबर, १९५६ या दिनांकाच्या अगोदर नसलेल्या अशा कोणत्याही दिनांकापासून भूतलक्षी प्रभावासह अंमलात येईल अशा रितीने करता येईल किंवा देता येईल.

(३) या कलमान्वये केलेले कोणतेही नियम किंवा आदेश, हे जणू काही या अधिनियमात समाविष्ट केले

---

१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ च्या कलम ८ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम १२-क दाखल करण्यात आले.

२. १८ सप्टेंबर, १९८१ पासून अंमलात आलेला, सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४८ च्या कलम ५ अन्वये कलम १२-ख समाविष्ट करण्यात आले.

३. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ७ अन्वये "रुपये ५०००" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ च्या कलम ३ अन्वये मूळ पोट-कलम (१) ऐवजी पोट-कलमे (१) व (१-क) दाखल करण्यात आली.

असल्याप्रमाणे परिणामक्षम असतील.

सन १९५२ चा मुंबई ८

निरसन.

१४. मुंबई विधानपरिषदेच्या (सभापतीचे व उपसभापतीचे) व मुंबई विधानसभेच्या (अध्यक्षांचे व उपाध्यक्षांचे) वेतन व भत्ते याबाबत अधिनियम, १९५२ [ज्यास यात यापुढे "सदरहू अधिनियम" असे म्हटले आहे] व जे प्रदेश दिनांक १ नोव्हेंबर, १९५६ नंतर नवीन *मुंबई राज्याचे भाग बनतात त्या प्रदेशात किंवा त्यांच्या संबंधात त्या दिनांकाच्या लगतपूर्वी अंमलात असलेला, या अधिनियमाच्या तरतुदींसारखा कोणताही कायदा, हे निरसित होतील :

परंतु, अशा रितीने सदरहू अधिनियम व कायदा निरसित करण्यात आला असला तरीही सदरहू अधिनियमान्वये केलेले कोणतेही नियम किंवा दिलेले कोणतेही आदेश , जेथवर ते या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, अंमलात असण्याचे चालू राहतील व ते या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमांद्वारे किंवा दिलेल्या कोणत्याही आदेशाद्वारे अधिक्रमित करण्यात आले असतील त्याव्यतिरिक्त व अधिक्रमित करण्यात येईपर्यंत, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये करण्यात किंवा देण्यात आले आहेत असे समजले पाहिजे.

---

* "मुंबई राज्याचे" या मजकुरात बदल केला जाणार नाही. [पहा : महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.]

एच-१-४०३७ पु.-७.२००६

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.